पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.३०१५, दि.१८/०९/२०१९**

**बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर**

---

**विमानाची तिकीटे काढून देतो म्हणून लाखो रुपयांची फसवणूक करणाऱ्याच्या ठगाच्या बंडगार्डन पोलीसांनी आवळल्या मुसक्या**

चर्तुःश्रृंगी पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणारे अनिल पुरुषोत्तम लिमये, रा. बाणेर, पुणे यांना त्यांचे कुटुंबासह दुबई येथे पर्यटणाकरीता जायचे असल्याने त्यांनी जस्ट डायलवर विमानाचे तिकीट काढून देणाऱ्या एजंटची माहिती घेतली असता त्यांना विशाल टुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्सचे सरबजितसिंग व्होरा यांचा नंबर मिळाला. त्यांनी त्यांचे नंबरवर फोन करुन दुबई येथे जाण्याकरीता विमानाच्या तिकीटांबाबत माहिती विचारली असता सरबजीतसिंग व्होरा याने त्यांना माहिती देऊन त्यांचा विश्वास संपादन करुन दुबईला जाण्याकरीता विमानाच्या ०४ तिकीटांकरीता १,१७,०००/- रु लागतील असे सांगितले. अनिल लिमये यांचा सरबजीतसिंग व्होरा याने विश्वास संपादन केल्याने प्रथम त्यांनी सरबजीतसिंग व्होरा याची सहकारी अर्चना राजेश मगादे हिचे नावे वरील रक्कमेचा चेक दिला. सरबजीतसिंग व्होरा व त्याची सहकारी अर्चना मगादे यांनी सदरची रक्कम घेऊन अनिल लिमये यांना दुबईला जाण्याकरीताची विमानाची तिकीटे न देता त्यांची १,१७,०००/- रु.ची फसवणूक केली. म्हणून अनिल लिमये यांनी त्यांचे विरुद्ध चतुःश्रृंगी पोलीस स्टेशनला १९ सप्टेंबर २०१८ रोजी दिलेल्या तक्रारीवरुन चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं.४३९/२०१८, भादंविक ४०६,४२०,३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदरचा गुन्हा दाखल झालेपासून ते दोघेही फरार होते. बंडगार्डन पोलीस स्टेशन कडील तपास पथकाला सरबजीतसिंग व्होरा हा पुणे कॅम्प येथे येणार असल्याची बातमी मिळाल्याने तपास पथकाने सापळा रचून त्यास ताब्यात घेऊन त्याच्याकडे कसून तपास केला असता त्याने चतुःश्रृंगी पोलीस स्टेशनकडील गुन्हा केल्याचे कबुल केल्याने त्याला पुढील तपास कामी चतुःश्रृंगी पोलीस स्टेशनच्या ताब्यात दिले आहे.

सदरची कारवाई परिमंडळ-२ चे पोलीस उप-आयुक्त श्री. शिरीष सरदेशपांडे, लष्कर विभागाचे सहा.पोलीस आयुक्त श्री. रविंद्र रसाळ, बंडगार्डन पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सुनिल तांबे, व पोलीस निरीक्षक, गुन्हे श्री. दिगंबर शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक श्री. संदिप जमदाडे, पोलीस कर्मचारी संतोष पागार, हरीष मोरे, नवनाथ डांगे, कैलास डुकरे, रुपेश पिसाळ, किरण तळेकर, नितीन साळुके, सागर जगताप, गौरव उभे यांनी केली.